महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एमआयएस-०६१५/सीआर-४०/२०२१/१३ दिनांक :-३० सप्टेंबर, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :-महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२२-संयुक्त पेपर १ च्या उपस्थितीबाबत**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२२ संयुक्त पेपर १ चे आयोजन दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी राज्यातील नवी मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती व नागपूर जिल्हाकेंद्रावर करण्यात आले आहे.

२. परीक्षेच्या दिवशी काही जिल्हाकेंद्रावर मुसळधार पावसाची व पावसामुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत होण्याची शक्यता आहे. तसेच, नवी मुंबई जिल्हाकेंद्राशी संबंधित रेल्वे मार्गांवर विशेषत: हार्बर मार्गावर मेगाब्लॉक असणार आहे. यास्तव, पाऊस, वाहतूक व्यवस्था व रेल्वे मार्गांवरील मेगाब्लॉक यांची स्थिती विचारात घेऊन उमेदवारांनी उपकेंद्रावर वेळेवर उपस्थित राहण्याचे नियोजन करावे.

३. उमेदवारांच्या उपकेंद्रावरील उपस्थितीकरीता विहित केलेल्या वेळेनंतर उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत परीक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच, विहित वेळेनंतर प्रवेश देण्याकरीता उपकेंद्रावरील कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालणाऱ्या किंवा कोणत्याही पध्दतीने दबाव आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांवर आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित सूचनांनुसार कारवाई करण्यात येईल.

सहसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग